**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षे़त्र, अमरावती/नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील कमांक 1161/2007.**

श्री अ. गो. निमकर, उपाध्यक्ष,
महाराष्ट्र राज्य रेखचित्र शाखा कर्मचारी संघटना
शुक्रवारी, राजेंद्र वार्ड, भंडारा ता.जि.भंडारा 04. ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा
उपसचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग,
मंत्रालय, मुंबई – 32.
2) जन माहिती अधिकारी तथा
अवर सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग,
मंत्रालय, मुंबई – 32. ..... **उत्तरवादी**

## नि र्ण य

अपीलकर्ता यांनी दिनांक 11.11.2006 रोजी (कार्यालयात प्राप्त दि. 21.11.2006 रोजी) राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 21.3.2006 रोजी वेतनश्रेणीतील तफावत दूर करण्याबाबत वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई–32 चे पत्र क. संकीर्ण 1005/प्र.क.60/सेवा–9 दिनांक 11.3.2005 चे पत्रावर केलेली शासन कार्यवाही या विषया संदर्भात श्री एस. एन. अगडे सहा. आरेखक महाराष्ट्र राज्य जीवन प्राधिकरण बांधकाम विभाग, भंडारा यांच्या

वेतनश्रेणीतील तफावत दूर करणे संघटनेचे दि. 8.7.2005 चे मा. मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई या पत्रावर शासनातर्फे करण्यात आलेल्या निर्णयाची प्रत मिळणे. सदरची माहिती टपालाद्वारे घेणार असे नमुद केलेले दिसून येते.

3. सदरच्या पत्राच्या अनुषंगाने अवर सचिव यांनी अपीलकर्ता यांना दि. 25.4.2006 रोजी माहितीचा अधिकार अधिनियम 2005 अन्वये आपण दि. 21 मार्च 2006 रोजी सादर केलेला अर्ज शासनास दि. 27 मार्च 2006 रोजी प्राप्त झाला असून त्या अनुषंगाने आपणास पुढील प्रमाणे कळविण्यात येत आहे. श्री एस. एन. अगडे सहा. आरेखक महाराष्ट्र राज्य जीवन प्राधिकरण बांधकाम विभाग, भंडारा यांच्या वेतनश्रेणीतील तफावतीबाबत मा. मुख्यमंत्री यांना दि. 8 जुलै 2005 रोजी संघटनेनी सादर केलेले निवेदन दि. 22.7.2005 रोजी मुख्य प्रशासकीय अधिकारी, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण मुंबई यांना पुढील कार्यवाहीसाठी पाठविलेले आहे. त्या पत्राचे अनुषंगाने वेतनश्रेणीतील तफावत दूर करणेबाबत अहवाल प्राप्त झाल्यावर तो तपासून त्या वर योग्य तो निर्णय घेण्यात येईल असे कळविलेले दिसून येते. सदरच्या निर्णयाने समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी दि. 4.9.2006 रोजी प्रधान सचिव, श्री विश्वास धुमाळ यांचेकडे प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. सदरच्या प्रथम अपीलाच्या संदर्भामध्ये दि. 14.9.2006 रोजी उपसचिव तथा माहिती अधिकारी महाराष्ट्र शासन यांनी याच संदर्भात आपण दि. 21.5.2006 रोजी अर्ज सादर केला होता. या अर्जाच्या संदर्भात आपल्या विभागाचे अवर सचिव तथा माहिती अधिकारी यांचेकडून पत्र क्र. ईएसटी 2006/प्रक 24/पा पु 23 दिनांक 25 एप्रिल 2006 च्या पत्रान्वये माहिती देण्यात आलेली आहे. आपल्या संघटनेने मा. मुख्यमंत्री यांना दि. 8 जुलै 2005 रोजी सादर केलेले निवेदन मुख्य प्रशासकीय अधिकारी म.जी.प्रा. यांचेकडे दि. 22 जुलै 2005 रोजी पाठविण्यात आले आहे. श्री अगडे सहा. आरेखक हे म.जी.प्रा.चे कर्मचारी असल्यामुळे त्यांच्या वेतनश्रेणीतील तफावती बाबतचा निर्णय म.जि.प्रा. स्तरावर होणे आवश्यक आहे. या संदर्भात त्यांना आवश्यकता असल्यास शासनाकडे मार्गदर्शन मागता येते. उपरोक्त वस्तुस्थिती विचारात घेता या

प्रकरणी आपण प्रथम म.जी.प्रा. कडून सद्यस्थिती जाणून घेणे उचीत होईल यास्तव या प्रकरणी आपल्याला म.जी.प्रा.कडून माहिती देण्याबाबत त्यांना कळविण्यात येत आहे.

5. माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या तरतुदीप्रमाणे माहिती ही ज्या माहिती अधिकारी यांना मागितलेली आहे त्यांनी विहित मुदतीत दि. 25.4.2006 रोजी पत्राच्या कार्यवाहीबद्यलची माहिती ही उपलब्ध करुन दिलेली आहे. त्यानंतर अपीलकर्ता यांनी प्रथम अपील मुदतीच्या नंतर दाखल केलेले असूनसुध्दा त्यांना त्याबाबतची माहिती ही म.जी.प्रा. कडून उपलब्ध करुन घेता येईल असे कळविण्यात आलेले दिसून येते. अपीलकर्ता यांचे प्रथम अपीलामध्ये सुध्दा संघटनेचे दि. 8.7.2005 च्या पत्राच्या संदर्भातच अपील करण्याचे कारण दिलेले दिसून येते. मात्र द्वितीय अपीलामध्ये सदर पत्रव्यवहारातून महाराष्ट्र जीवन प्राधिकरण हे या कार्यालयातून त्या कार्यालयात अशी फेकाफेकी करीत असून मुळ प्रकरणाला बगल देण्याचा हेतू दिसून येत असल्याचे सदर प्रकरणी श्री अगडे यांचे वेतनश्रेणीतील तफावत दूर करण्याच्या प्रकरणाचा आपल्या स्तरावरुन निपटारा करण्यात यावा व श्री अगडे सहा. आरेखक महाराष्ट्र राज्य जीवन प्राधिकरण बांधकाम विभाग, भंडारा यांच्या वेतनश्रेणीतील तफावत दूर करण्यात यावी व श्री अगडे यांना न्याय मिळावा याकरीता अपील करण्यात येत आहे असे कारण दिलेले दिसून येते. सदरच्या द्वितीय अपीलाच्या प्रतिलिपी अनेक अधिका–यांना पाठविलेल्या दिसून येतात. सदरच्या राज्य माहिती आयोगाकडील वर नमुद केलेल्या विनंती वरुन असे दिसून येते की अपीलकर्ता यांना सदरच्या प्रकरणामध्ये वेतनश्रेणीच्या संदर्भामध्ये अंतिम कारवाई आयोगाने करावी अशी अपेक्षा दिसून येते. परंतु माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 2 मधील ‘‘माहिती‘‘ व ‘‘माहितीचा अधिकार‘‘ या संज्ञेच्या व्याख्येप्रमाणे सार्वजनिक प्राधिकरणातील माहिती ही ज्या साहित्याच्या स्वरुपात उदा. अभिलेखे, कागदपत्रे, दस्तऐवज, टिपण्या, शासन निर्णय, परिपत्रके इ. मध्ये उपलब्ध असेल त्या स्वरुपात छायांकित प्रती माहितीचा अधिकार या संज्ञेप्रमाणे उपलब्ध करुन देणे अपेक्षित आहे. कोणत्याही प्रकरणातील निर्णय प्रक्रियेच्या संदर्भात कोणताही कारवाईचे आदेश देणे हे राज्य माहिती आयोगाच्या कक्षेबाहेरील आहे. व त्यामुळेच

सकृतदर्शनी अपीलकर्ता यांचे द्वितीय अपील हे खारीज करण्यास पात्र आहे. जन माहिती अधिकारी वर नमुद केल्याप्रमाणे विहित मुदतीत विचारलेल्या माहितीच्या संदर्भामध्ये माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. तसेच प्रथम अपील मुदतबाहय असले तरी त्यांना माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. ''माहिती'' याचा अर्थ पुन्हा सद्य परिस्थिती काय असेल असा होत असल्यामुळे वरील माहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी यांनी वस्तुस्थिती विषद केलेली आहे. असे असले तरी सदरच्या अर्जाच्या संदर्भातील पुढील कार्यवाही अर्जदारास म.जी.प्रा.च्या दि. 8.7.2007 च्या पत्रान्वये निर्णयाची माहिती उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. अर्थातच त्या अर्जावारील जी कार्यवाही आहे ती माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या तरतुदीप्रमाणे नाही व ती त्याप्रमाणे अपेक्षित पण नाही.

## आ दे श

1) अपीलकर्ता यांना अधिनियमाच्या तरतुदीप्रमाणे विहित मुदतीत माहिती उपलब्ध करुन दिलेली असल्यामुळे व द्वितीय अपीलातील वेतन तफावत दूर करुन मिळण्याबाबतची विनंती ही मान्य करता येत नसल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यात येत आहे.
2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर

दिनांक 4.3.2008

( विलास पाटील )

राज्य माहिती आयुक्त,

विदर्भ क्षेत्र, नागपूर.